पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

ई मेल dcphq.pcpc-mh@gov.in

दुरध्वनी क्र. ०२० - २७३५०१२०

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट**

दिनांक - २५ /०२/२०२३

## २०५-चिंचवड ( विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुक-२०२३)

२०५-चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचे मतदान दिनांक-२६/०२/२०२३ रोजी होणार असल्याने, पोटनिवडणुक कालावधीत सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील १) चिंचवड, २) सांगवी, ३) वाकड,४) हिंजवडी, ५) देहूरोड, ६) रावेत या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील **८७ मतदान केंद्रांच्या (इमारत) १०० मीटर परिसराचे आतील** सर्व व्यावसायिक दुकाने, रेस्टॉरन्ट, टपऱ्या, (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत तसेच मतदान केंद्रांचे परिसरात व मतदान केंद्राचे आतील भागात कोणत्याही प्रकारची हत्यारे/अग्निशस्त्रे जवळ बाळगता येणार नाही.सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचा-यांना (पोलीस दल,संरक्षण दल, तुरंग विभाग, बॅंक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना) लागू राहणार नसलेबाबतचा दिनांक २६/०२/२०२३ रोजी ००/०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश जारी करण्यात आलेला आहे.

तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील **२०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे राजकीय व्यक्तीं जर ते त्या मतदार संघाचे मतदार नसतील तर त्या मतदार संघात थांबणेस प्रतिबंध करण्याबाबत** पोटनिवडणूकीचा प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून (दिनांक २४/०२/२०२३ चे १८.०० वा. पासून ते दिनांक २६/०२/२०२३ चे मतदान प्रक्रिया संपेपर्यंत) मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघात थांबणेस/वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात येत असलेबाबतचा फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडून काढण्यात आला असून, उपरोक्त दोन्ही आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहणार असलेबाबतचा आदेश जारी केले आहेत.

---

Scanned with CamScanner